भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# करराधान निधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४

**(सन १९५४ चा अधिनियम क्रमांक ४१)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954

**(Act No. 41 of 1954)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ४.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि टॅक्सेशन लॉज (एक्स्टेन्शन टू जम्मू अॅन्ड काश्मीर) अॅक्ट, १९५४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी २००३ यात पृष्ठ ४ ते ८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This adition of the Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Cazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 4 to 8.

This authoritative text was published under the authority of the president under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# कराधान विधी (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव.
२. जम्मू व काश्मीरवर विवक्षित कराधान विधीचा विस्तार करणे.
३. विवक्षित कालावधीसाठी मोटार स्पिरीटवरील विद्यमान शुल्क चालू ठेवणे.
४. जम्मू व काश्मीरमध्ये अंमलात नसलेल्या विधीच्या निर्देशांचा अर्थ लावणे.
५. निरसने.
६. व्यावृत्ती.
७. कोणत्याही निरसित विधीतील अधिकारी, प्राधिकरणे इत्यादींच्या निदशांचा अर्थ लावणे.
८. अडचणी दूर करणे.
अनुसूची.

मुद्र ४१३१—२ (१०३५-१-२००४)

# कराधान विधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४

## (१९५४ चा अधिनियम क्रमांक ४१)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[८ ऑक्टोबर, १९५४]

**जम्मू व काश्मीर राज्यावर विवक्षित कराधान विधींचा विस्तार करण्याचा व त्यांच्याशी संबंधित बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पाचव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमाला, 'कराधान विधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४' असे म्हणावे.

जम्मू व काश्मीरवर विवक्षित कराधान विधींचा विस्तार करणे.

२. (१) पुढील अधिनियम म्हणजे,—

(क) सागरी सीमा शुल्क अधिनियम, १८७८ (१८७८ चा आठ) ;
(ख) भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२ (१९२२ चा अकरा) ;
(ग) भू-सीमा शुल्क अधिनियम, १९२४ (१९२४ चा एकोणीस) ;
(घ) शासकीय व्यापार कराधान अधिनियम, १९२६ (१९२६ चा तीन) ;
(ङ) भारतीय प्रशुल्क अधिनियम, १९३४ (१९३४ चा बत्तीस) ;
(च) केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४ (१९४४ चा एक) ;
(छ) कर भरणा (संपत्ति-हस्तांतरण) अधिनियम, १९४९ (१९४९ चा बत्तीस) ; व
(ज) संपदा शुल्क अधिनियम, १९५३ (१९५३ चा चौतीस).

व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या वरील अधिनियमांखाली केलेले सर्व नियम व आदेश यांद्वारे जम्मू व काश्मीर राज्यावर विस्तारित करण्यात येत आहेत आणि तेथे ते अंमलात राहतील.

(२) अनुसूचीत नमूद केलेले अधिनियम या अधिनियमाच्या प्रारंभी व तेव्हापासून त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विशोधित केले जातील.

(३) 'वित्त अधिनियम, १९५१' (१९५१ चा तेवीस) व त्याची पहिली अनुसूची हे जेथवर 'वित्त अधिनियम, १९५४' (१९५४ चा सतरा) याद्वारे १९५४-५५ च्या वित्तीय वर्षासाठी आयकर व अधिकर यांच्या संबंधात लागू करण्यात आलेले आहेत तेथवर ते, जणू काही 'वित्त अधिनियम, १९५१' च्या पहिल्या अनुसूचीच्या भाग एक व दोन मधून "जम्मू व काश्मीर राज्य वगळून" हे शब्द व "किंवा (३ङ)" हा शब्द, कंस व आकडा व अक्षरही गाळण्यात आली असावीत, त्याप्रमाणे परिणामक होतील.

(४) 'वित्त अधिनियम, १९५४' (१९५४ चा सतरा) याची ६ व १० ही जी कलमे अनुक्रमे विवक्षित अतिरिक्त सीमा शुल्के व उत्पादन शुल्के बसवतात ती शेष भारताला जशी लागू होतात व तेथे परिणामक होतात तशीच ती जम्मू व काश्मीर राज्यास लागू होतील व तेथे परिणामक होतील.

विवक्षित कालावधीसाठी मोटार स्पिरिटवरील विद्यमान शुल्क चालू ठेवणे.

३. जम्मू व काश्मीर राज्याचे शासन, त्या राज्यातील पुरवठाकाराने किंवा त्याच्या वतीने प्राधिकृत झालेल्या अभिकर्त्याने राज्यात पेट्रोलच्या टाक्यांद्वारे आयात केलेले मोटार स्पिरिट खेरीजकरून अन्यथा आयात केलेले सर्व मोटार स्पिरिटवर दर इम्पिरिअल गॅलनात चार आणे या दराने किंवा या संबंधात दर इम्पिरिअल गॅलनमागे राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कमी दराने १४ मे, १९५४ पासून दहा वर्षे इतका काळ शुल्क आकारणे व वसूल करणे चालू ठेवू शकेल.

जम्मू व काश्मीरमध्ये अंमलात नसलेल्या विधींच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

४. कलम २ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अधिनियमात जम्मू व काश्मीरमध्ये अंमलात नसलेल्या विधीचा जो कोणताही निर्देश असेल त्याचा त्या राज्याच्या संबंधात, त्या राज्यात कोणताही समनुरूप विधि अंमलात असेल तर त्या विधीचा निर्देश म्हणून अर्थ लावला जाईल.

निरसने.

५. कलम ६ मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून खालील विधि याद्वारे निरसित करण्यात येत आहेत, ते असे,—

(क) आगपेट्या (उत्पादन शुल्क) अधिनियम, संवत १९९२ (संवत १९९२ चा चार) ;
(ख) यांत्रिक ज्वालक (उत्पादन शुल्क) अधिनियम, संवत १९९२ (संवत १९९२ चा पाच) ;
(ग) साखर (उत्पादन शुल्क) अधिनियम, संवत २००० (संवत २००० चा सहा) ;

(घ) तंबाखू (उत्पादन शुल्क) अध्यादेश, संवत २००१ (संवत २००१ चा सहा) ;

(ङ) प्राप्तिकर अधिनियम, संवत २००७ (संवत २००७ चा दहा) ; आणि

(च) जम्मू व काश्मीर सीमा शुल्क अधिनियम, संवत १९५८, खालील उपबंध खेरीजकरून, ते असे,—

(१) जम्मू व काश्मीर राज्यातील मुद्रणालय व प्रकाशने अधिनियम, संवत १९८९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वृत्तपत्रे किंवा पुस्तके यांची आयात किंवा निर्यात प्रतिषिद्ध करण्यास कलम २५ द्वारे राज्य शासनास जेथवर प्राधिकृत करते तेथवर ते कलम,

(२) कलम २५ क, २५ ख आणि २५ ग, आणि

(३) उपखंड (१) व (२) यात निर्दिष्ट केलेल्या कलमामध्ये अंतर्भूत असलेले उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक किंवा संबद्ध असेल अशा उक्त अधिनियमात असलेला अन्य कोणताही उपबंध.

व्यावृत्ती. ६. (१) कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विधीचे त्याद्वारे निरसन केलेले असले तरीही,—

(क) कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मोटार-स्पिरीटवरील शुल्काची आकारणी, निर्धारण, वसुली किंवा परतावा यांच्या किंवा कोणत्याही वस्तूची मे, १९५४ च्या १४ व्या दिवसापूर्वी जम्मू व काश्मीर राज्यात केलेली आयात किंवा त्या राज्यातून केलेली निर्यात यांच्याबाबत देय असलेल्या कोणत्याही शुल्काची आकारणी, निर्धारण व वसुली यांच्या प्रयोजनार्थ किंवा कोणतीही शास्ती लादण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उपरोक्त अशा कोणत्याही प्रयोजनाशी कशाही प्रकारे निगडित असलेल्या किंवा तद्नुषंगिक अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ 'जम्मू व काश्मीर सीमा शुल्क अधिनियम, संवत १९५८' हा परिणामक असण्याचे चालू राहील.

(ख) आयकर अधिनियम, संवत २००७ (संवत २००७ चा दहा) हा, आयकर व अधिकर यांची आकारणी, निर्धारण व वसुली या प्रयोजनासाठी किंवा 'भारतीय आयकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा अकरा) याखालील निर्धारणाच्या प्रयोजनापुरते जे मागील वर्ष असेल त्यापूर्वीच्या कोणत्याही अवधीबाबतची, त्या अधिनियमाखालील कोणतीही शास्ती, व्याज, आपसमेळ-फी किंवा इतर कोणतीही मागणी यांच्या प्रयोजनार्थ ३१ मार्च, १९५५ रोजी संपणाऱ्या वर्षापुरता परिणामक असण्याचे चालू राहील.

(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधास बाध न येता आणि त्यांच्या अधीनतेने, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा दहा) याचे ६ वे कलम, कलम ५ मध्ये निर्देशिलेल्यांपैकी कोणत्याही विधीच्या संबंधात, जणू काही याप्रमाणे निरसित केलेला विधि म्हणजे त्या अधिनियमाच्या कलम ६ च्या अर्थान्वये अधिनियमिती असावी त्याप्रमाणे लागू होईल.

कोणत्याही निरसित विधीतील अधिकारी, प्राधिकरणे इ. च्या निर्देशांचा अर्थ लावणे. ७. कलम ६ च्या पोटकलम (१) चा खंड (ख) व त्याचे पोटकलम (२) यात अंतर्भूत असलेले उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी, या अधिनियमाद्वारे आता निरसित केलेल्या जम्मू व काश्मीर राज्याच्या कोणत्याही विधीतील अधिकारी, प्राधिकरण, अधिकरण किंवा न्यायालय, यांच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, त्या राज्यावर आता विस्तारित केलेल्या समनुरूप अधिनियमाच्या, नियमाच्या किंवा आदेशाच्याद्वारे किंवा त्याखाली नियुक्त केलेल्या समनुरूप अधिकाऱ्याचा किंवा घटित केलेल्या समनुरूप प्राधिकरणाचा, अधिकरणाचा किंवा न्यायालयाचा निर्देश म्हणून लावला जाईल, आणि असा समनुरूप अधिकारी, प्राधिकरण, अधिकरण किंवा न्यायालय कोणते असा प्रश्न उद्‌भवल्यास केंद्र सरकारचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

अडचणी दूर करणे. ८. जम्मू व काश्मीर राज्यात आता विस्तारित केलेले अधिनियम, नियम किंवा आदेश यांपैकी कशाचाही, कोणताही उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी केंद्र सरकार **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, आपणास आवश्यक वाटेल असा उपबंध करू शकेल किंवा निदेश देऊ शकेल.

अनुसूची

[कलम २ (२) पहा.]

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | विशोधने (४) |
|---|---|---|---|
| १८७८ | आठ | सागरी सीमा शुल्क अधिनियम, १८७८. | कलम १ मध्ये " जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून " हा मजकूर गाळावा.<br>कलम ३ मध्ये, खंड ( ङ ) गाळावा. |
| १९२२ | अकरा | भारतीय आयकर अधिनियम, १९२२. | कलम १ मध्ये पोटकलम (२) ऐवजी " (२) त्याचा संपूर्ण भारतावर विस्तार आहे. " हा मजकूर घालावा.<br>कलम २ मध्ये, खंड (७क) ऐवजी पुढील मजकूर घालावा :–<br>" (७क) 'भारतीय कंपनी' याचा अर्थ, "भारतीय कंपनी अधिनियम, १९१३" (१९१३ चा सात) मध्ये व्याख्या करण्यात आली तशी कंपनी, असा आहे, आणि विलीन राज्यक्षेत्रात किंवा जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य कोणत्याही भाग ख राज्यावर 'भारतीय कंपनी अधिनियम, १९१३' विस्तारित होण्यापूर्वी तेथे अंमलात असलेल्या कोणत्याही विधी-खाली घटित केलेली आणि नोंदणी केलेली कंपनी, आणि जम्मू व काश्मीर राज्याच्या बाबतीत त्या राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही विधीखाली घटित केलेली व नोंदणी केलेली कोणतीही कंपनी, त्यात समाविष्ट आहे ; परंतु सर्व बाबतीत कंपनीचे नोंदलेले कार्यालय करपात्र राज्यक्षेत्रांत असले पाहिजे. ".<br>खंड (८) मध्ये "केंद्र शासनाने" या शब्दानंतर "किंवा जम्मू व काश्मीर राज्यात, राज्य शासनाने " हे शब्द घालावेत.<br>खंड (१४ क) मध्ये,–<br>(क) पोटकलम (घ) मध्ये,–<br>शेवटचा " आणि " हा शब्द गाळावा ;<br>(ख) पोटकलम (ङ) नंतर,–<br>" (च) १२ एप्रिल, १९५४ नंतरच्या कोणत्याही कालावधीबाबत, भारताचे संपूर्ण राज्यक्षेत्र " हा मजकूर घालावा ;<br>(ग) परंतुकाच्या खंड (ख) नंतर पुढील मजकूर घालावा :—<br>"(ग) (१) कोणत्याही कालावधीबाबत, कलमे ४क व ४ख यांच्या प्रयोजनांकरता ;<br>(२) ३१ मार्च, १९५४ नंतरच्या कोणत्याही कालावधीबाबत, या अधिनियमाच्या कोणत्याही एखाद्या प्रयोजनाकरिता ; आणि<br>(३) आधीच्या वर्षात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कालावधीबाबत, ३१ मार्च, १९५५ या दिवशी संपणाऱ्या वर्षाकरिता किंवा, नंतरच्या कोणत्याही वर्षाकरिता, कोणतेही निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ,<br>भारताचे संपूर्ण राज्यक्षेत्र."<br>कलम ४ मध्ये, पोटकलम (१) च्या स्पष्टीकरण ४ मधील, "जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य" हा मजकूर गाळावा. |

अनुसूची—(पुढे चालू)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | विशोधने (४) |
|---|---|---|---|
| | | | कलम ७ मध्ये, पोटकलम (२) गाळावे.<br>कलम १४ मध्ये, पोटकलम (२) यात,—<br>(१) खंड (ख) च्या अखेरचा "किंवा" हा शब्द गाळावा; आणि<br>(२) खंड (ग) गाळावा. |
| | | | कलम २४ मधील, पोटकलम (१) मध्ये,—<br>(१) पहिले परंतुक गाळावे, आणि<br>(२) दुसऱ्या परंतुकातील पोटकलम (२) मधील "आणखी असे की," हे शब्द गाळावेत; पोट-कलम (२) मध्ये परंतुकाचा खंड (क) गाळावा. |
| | | | कलम ४९ क मध्ये खंड (क) मधील "जम्मू व काश्मीर राज्याच्या शासनाशी किंवा" हे शब्द गाळावेत आणि "त्या राज्यात किंवा प्रकरणपरत्वे, त्या देशात" या शब्दांऐवजी "त्या देशात" हे शब्द घालावेत. |
| | | | कलम ४९ ख मध्ये, पोटकलम (२) मधील "जम्मू व काश्मीर शासनाहून अन्य" हा मजकूर गाळावा. |
| | | | कलम ६० क च्या परंतुकामध्ये, "३१ मार्च, १९५५ नंतर" हे शब्द व आकडे यांऐवजी "विलीन राज्यक्षेत्रे आणि जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य अशा भाग ख राज्यांच्या बाबतीत, ३१ मार्च, १९५५ नंतर, आणि जम्मू व काश्मीर राज्याच्या बाबतीत, ३१ मार्च, १९५९ नंतर" हा मजकूर घालावा. |
| | | | कलम ६१ मध्ये, पोटकलम (२) च्या खंड (४) (क) मधील "जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य कोणत्याही भाग ख राज्यात" या शब्दानंतर "किंवा १४ मे, १९५४ या दिवशी किंवा त्यापूर्वी, जम्मू व काश्मीर राज्यात" हा मजकूर घालावा. |
| १९२४ | एकोणीस | भू-सीमा शुल्क अधिनियम, १९२४. | कलम १ मध्ये "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळावा. |
| १९२६ | तीन | शासकीय व्यापार कराधान अधिनियम, १९२६. | कलम २ मध्ये पोटकलम (३) मधील "आणि भारत." याचा अर्थ, "जम्मू व काश्मीर राज्य वगळून भारताचे राज्यक्षेत्र, असा आहे." हा मजकूर गाळावा. |
| १९३४ | बत्तीस | भारतीय प्रशुल्क अधिनियम, १९३४. | कलम १ मधील, पोटकलम (२) मधील "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळावा. |
| १९४४ | एक | केंद्रीय उत्पादन शुल्क आणि मीठ अधिनियम, १९४४. | कलम १ मध्ये, पोटकलम (२) मधील "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळावा.<br>कलम २ मध्ये खंड (ङ ङ) गाळावा.<br>कलम ५ गाळावे.<br>कलम ३७ मध्ये, पोटकलम (२) च्या खंड (३) मधील, "जम्मू व काश्मीर राज्यातून भारतात उत्पादन शुल्क-पात्र माल आणणे किंवा" हा मजकूर गाळावा. |

अनुसूची—(समाप्त)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | विशोधने (४) |
|---|---|---|---|
| १९४९ | बावीस | कर भरणा (संपत्ति हस्तांतरण) अधिनियम, १९४९. | कलम १ मध्ये, पोटकलम (२) मधील "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळावा.<br>कलम २ मध्ये, "राज्यांच्या" उल्लेखांऐवजी "भारताचे" उल्लेख घालावेत आणि स्पष्टीकरण गाळावे. |
| १९५३ | चौतीस | संपदा शुल्क अधिनियम, १९५३ | कलम १ मध्ये, पोटकलम (२) मधील "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळावा.<br>कलम ५० मधील, "जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य" हा मजकूर गाळावा. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई